# तीताला

Titus

# तीताला

*पौलाचे तीतास पत्र*

## 1

1 परमेश्वराचा सेवक व येशूंचा प्रेषित पौल यातर्फे मला पाठविले गेले त्याचे कारण असे होते, की परमेश्वराने
निवडलेल्या लोकांकडे जाऊन, मी पौलाने विश्वास व सच्चेपणाची समज यापर्यंत त्यांना पोचवावे, जेणेकरून
निवडलेल्यांना एक खरे व योग्य प्रकारचे जीवन जगता यावे. 2 परमेश्वर (जो) खोटे बोलूच शकत नाही, त्याने दुनियेच्या
आरंभापूर्वीच त्या अनंत जीवनाच्या आशेची प्रतिज्ञा केली आहे. 3 परमेश्वर व तारकाच्या आदेशानुसार ऐतिहासिक दृष्टिने
एका यथायोग्य (ठराविक-समय) वेळी, मला (पौलाला) त्या येशु-वार्तेची घोषणा करावयाचे कार्य (सेवा) दिले गेले.
4 तीत विश्वासाच्या सहभागितेतील माझा सच्चा मुलगा (पुत्र) आहे. लाडक्या तीता, परमेश्वर बाप व आपले तारक
ख्रिस्त येशू यांच्यापासून तुला कृपा व शांति मिळो.
5 क्रेत येथे मी तुला ठेवून आलो होतो. तुला अपूर्ण राहिलेल्या बाबींची सुधारणा (व्यवस्थित कराव्या) करता यावी
आणि मी दिलेल्या आज्ञेप्रमाणे, प्रत्येक शहरात वडील नेमता यावेत म्हणून मी तुला तेथेचे ठेविले होते. 6 पुढारी (प्राचीन)
असे असावे: कोणत्याही आरोपाविना, एकाच पत्नीचा पति आणि संयम बाळगून वागणारा असावे, त्यांची मुलेबाळें
विश्वासीं अर्थात मुक्तीचा अनुभव आलेली अशी असावयासच हवीत. 7 राखण करणाऱ्याने (अध्यक्ष) तो परमेश्वराचा
भंडारी (देखरेखकर्ता) असल्यामुळे निर्दोष पुरुष असावयास हवे. हट्टीपणा, रागीटपणा, दारुबाजीचा गुलाम असलेला,
भांडखोरपणाची सवय असलेला, पैसे मिळविण्याची लोभी वृत्ति बाळगणारा असे दुर्गूण त्याच्यामध्ये नसावेत.
8 याविपरित अध्यक्ष, आतिथ्य (पाहुण्यांची सेवा) करणारा, भलेपणाची कृत्येंकरण्याचे सद्‌गुण बाळगणारा व
चांगुल्यांची आवड धरणारा, असा पुरुष असावा. त्याची समज व विचार करण्याची शैली (योग्यविचार) उत्तम असावी.
योग्य विचार, सच्चेपणा, पवित्रता व संयमही त्याच्या जीवनात अवश्य असावाच. 9 त्याने विश्वसनीय वचन पक्के धरून
ठेवावे अर्थात जसे त्याला शिकविण्यात आले होते तसेच, म्हणजे असे होईल, की त्या अचूक सिद्धांताच्या साहाय्याने
(आधारे) तो लोकांना शिकवू शकेल आणि त्यामुळे वचनाच्या विरोधात बकवाद आणि चर्चा-वाद करणाऱ्या लोकांना,
विश्वास व खात्री देण्याच्या योग्य संधिचा लाभ त्याला घेता येईल (शक्य होईल).
10 अनेक (बहुतांशी) लोक अनियंत्रित असल्यामुळे व्यर्थ (पोकळ) वटवट करणारे, निरर्थक वादविवाद करणारे व
फसविणारे (धोकेबाज) आहेत, असे लोक विशेषतः सुंता झालेल्यांपैकीच आहेत. 11 अशा बकवादी लोकांची तोंडें बंद
केली जाणे गरजेचे आहे. ते लोक त्यांचा फायदा व्हावा म्हणून, जे शिकवू नये नेमके तेच शिकवितात. परिणामी त्यांच्या
चुकीच्या शिकवणीमुळे ते संपूर्ण घराण्याच्या विश्वासाचाच नाश करणारे ठरतात. 12 त्यांच्यापैकीच एक संदेष्टा म्हणतो,
''क्रेतीय नेहमीच खोटे, लबाड, दुष्ट पशू, आळशी व खादाड (पेटू) असतात". 13 ही गोष्ट सत्य (खरी) आहेही. म्हणून
त्यांच्यावर कडकपणे रागे भर, तुझा त्यांच्यावर ओरडा होणे योग्य आहे, जेणेकरून त्यांच्या विश्वासाठायी त्यांनी भक्कम
होऊन मजबूत रहावे. 14 त्यांनी यहूदी कथा-कहाण्यांकडे व जे लोक सत्यापासून बहकले-भटकले आहेत, त्या
माणसांच्या आज्ञांकडेही लक्ष देऊ नये, फक्त विश्वासाविषयी गांभीर्य पाळावे. 15 पहा, तीता, जे लोक पवित्र (शुद्ध)
आहेत, त्यांच्याकरिता सर्व काही पवित्र (शुद्ध) आहे, परंतु, जे अशुद्ध व अविश्वासी लोक आहेत, त्यांच्यासाठी काहीही
शुद्ध नाहीये. त्यांची बुद्धि आणि त्यांचा विवेक ही दोन्हीं देखील अशुद्ध आहेत. 16 स्वमुखाने, मोठ्या दिमाखाने
परमेश्वराला ओळखण्याचा ते दावा करितात, परंतु, ते त्याला नाकबूल (अमान्य) करितात, कारण त्यांची कार्यें (कृति)
पाहिली तर असे मुळीच दिसत नाही. ते अतिशय घृणामय, घाणीने भरलेले, आज्ञा भंग करून वारंवार ती मोडणारे, आणि
भल्या-भलेपणाची कृत्यें बाबतीत मात्र, केवळ नालायकच आहेत.

## 2

1 तीता, ज्या गोष्टी सच्च्या शिकवणीनुसार, यथायोग्य व बरोबर आहेत, त्याच बोलत रहा. 2 जी म्हातारी (वृद्ध)
पुरुष-चर्च आहे, तिने गंभीर असावे. आदरणीय असावे; त्याबरोबरच संयम राखणारे, विश्वासात, प्रेमात व धीर या सर्वांत
खंबीर (दृढ) व मजबूत असावे. 3 म्हाताऱ्या स्त्रियांनी सुद्धा व्यवहारात आदरणीय, बदनामी करण्यापासून दूर, दारुपासून
दूर (व्यसन/लतमुक्त) आणि विश्वसनीयतेने फक्त चांगल्या गोष्टींची शिकवण देणाऱ्या असावे. 4 ते अशासाठी की त्यांनी
तरुण महिलांना त्यांच्या पतींवर व मुलांबाळांवर प्रेम करणे शिकवावे, त्याविषयीचे व्यवस्थित शिक्षण द्यावे.
5 याबरोबरच , संयमी, पवित्र, घराची देखरेख, व्यवस्था करणाऱ्या व पतींची आज्ञा पाळणाऱ्या का असावे याचेही
शिक्षण द्यावे, जेणेकरून प्रभूच्या संदेश-वचनांची निदांनालस्ती (बदनामी) होऊ नये.
6 याच प्रकारे तरुण पुरुषांनी संयमी (डोके शांत) असण्याची शिकवण (शिक्षण) देत रहा. 7 प्रत्येक परिसीमेत
(क्षेत्र-मर्यादा) दुसऱ्या लोकांसाठी एक उत्तम व आदर्श नमूना हो. शिक्षणात ईमानदारी, गंभीरपणा, पवित्रता, 8 वाजवी व
योग्य बोलचाल (सद्भाषण-शैली), अर्थात अशी, की कोणी ती अयोग्य व वाईट म्हणावयास धजू (हिंमत करू नये) नये.
ते अशासाठी की त्यान्वये तुझा विरोध करणाऱ्या लोकांना लाज वाटावी, आणि तुझ्याविरुद्ध कसलेही गैरभाषण (वाईट
बोलणे) करण्यासाठी त्यांच्याजवळ काहीही नसावे.
9 पहा, नोकरांना (सेवक) स्पष्ट आदेश दे, की त्यांनी त्यांच्या स्वामींचे ऐकावे (आज्ञापालन) व प्रत्येक बाबतीत (सर्व
प्रकारे) त्यांना संपूर्णरीतिने प्रसन्न (समाधानी) ठेवावे, आणि उलट उत्तर न देता त्यांच्याप्रत आधीन असावे. 10 सेवकांना
शिकीव की त्यांनी चोरी करू नये, परंतु विश्वसनीय-सेवक व्हावे, यासाठी की आपल्या परमेश्वराच्या व उद्धारकर्त्याच्या
शिकवणीची सुंदरता (शोभा) वाढत जावी.
11 कारण परमेश्वरी कृपा जिच्याद्वारे मुक्ति आहे, ती सर्व लोकांसाठी प्रगट झाली आहे, 12 तीच कृपा आपणास बोध
(शिकविते) करिते की आपण कशा प्रकारे दुष्टाईचा व दुनियेच्या अभिलाषांचा त्याग करावा (अस्वीकार), आणि
त्याऐवजी गंभीरपणा, सच्चेपणा व परमेश्वरी स्वभाव बाळगून, त्याच स्वभावासह वर्तमान युगात जगावे-वागावे. 13 आणि
परमेश्वरी स्वभावासह, एक मोठी आशा अर्थात परमेश्वर व मुक्तिदाता येशूंच्या महिमामय द्वितीय आगमनाची (प्रगट होणे)
वाट पाहणारे व्हावे. 14 होय, त्याच येशूंची, ज्यांनी स्वतःस आपल्यासाठी देऊन टाकले, जेणेकरून त्याद्वारे आपणास
सर्व प्रकारच्या दुष्टाईपासून सोडवून (मुक्त-सुटका) व पवित्र करून, आपल्या स्वतःसाठी विशेष (हमखास) लोक तयार
करावेत. यासाठीच की त्या मुक्त झालेल्या खास लोकांनी, केवळ सत्कृत्यें करण्यासाठी उष्मऊर्जेने-तडफदार (उत्साही)
असावे.
15 या उत्तम (आदर्शमय) गोष्टी शिकवीत रहा, त्यांची हिंमत वाढीव, संपूर्ण अधिकाराने यथायोग्य ओरडा कर,
खडसावून सांग, रागे भर. तीता, सावधगिरीने वर्तन कर; कोणीही तुला तुच्छ लेखता कामा (कमी समजू) नये.

## 3

1 जे शासनकर्ते वा अधिकारीगण आहेत, त्यांच्याप्रत लोकांनी कसे आज्ञाधारक असावे व हितकार्ये (चांगली)
करण्यासंबंधी कसे आवेशी (तयार) असावे याची नीटशी शिकवण त्यांना दे. 2 त्यांना याचेही शिक्षण दे, की त्यांनी
कोणाविषयी वाईट बोलू नये, भांडखोर होऊ नये परंतु, त्याऐवजी कोमल (प्रेमळ) स्वभाव स्वतःठायी राखून, सर्व
लोकांशी नम्रतेनेच व्यवहार (वागावे) करावा.
3 कारण जुन्या जीवनात (पूर्वीचे) आम्हीही मूर्ख,बुद्धि नसल्यागत, आज्ञापालन न करणारे होतो. धोक्यांमध्ये, सगळ्या
अभिलांषांमध्ये मग्न होतो. आम्हांला देखील सुखविलासाची चाह होतीच. कडूपणाचे (कटुता) ईर्षाखोर व द्वेषपूर्ण जीवन
जगणारेही (व्यतित करणारे) होतो. 4 परंतु, आपला परमेश्वर व मुक्तिदात्याची दया व प्रेम जेव्हा लोकांवर प्रगट झाले,
5 तेव्हा त्याने आम्हांस मुक्ति दिली, ते तारण आमच्या धर्म-कर्मांमुळे नव्हे, परंतु, त्याच्याच कृपेद्वारे नवीन जन्माचे स्नान
व पवित्र आत्म्याच्या नवीनीकरणाद्वारे झाले होते. 6 जो (आत्मा) त्याने आपले उद्धारक येशू यांच्याद्वारे विपुल प्रमाणात

आपल्यावर ओतला आहे. 7 ते अशासाठी की त्याच्या कृपेमुळे धार्मिक (निर्दोषी) ठरविले गेल्याने, आपण
अनंतजीवनाच्या आशेनुसार (प्रमाणे) अंत नसणाऱ्यां जीवनाचे वारीस व्हावे.
8 ही गोष्ट वास्तविक पाहाता खरी आहे म्हणून माझी अशी इच्छाही आहे, की तू या वचनांची लगातार (निरंतर)
घोषणा करीत जावी, की ज्या लोकांनी परमेश्वरावर भरंवसा ठेवला आहे, त्या सर्व लोकांनी फक्त चांगल्या व इतरांच्या
कल्याणाच्या कार्यांतच सतत व्यस्त असावे. या गोष्टी उत्तम आहेत व लोकांसाठी फायद्याच्याही (लाभदायक) आहेत.
9 परंतु, मूर्खपणाचे विवाद, वंशावळयांचे व नियमशास्त्रासंबंधीचे मतभेद असणाऱ्यां विषयांपासून व
भांडण-तंटयांपासून त्यांनी दूर रहावे. त्या बकवादी गोष्टी कुचकामाच्या बिनफायद्याच्या व व्यर्थ आहेत. 10 ज्याला
एकदां-दोनदां मनाई केली, परंतु, जो मनुष्य सत्याबरोबरच, खोटयाच्याही भेसळीत टिकूनच असतो, (अर्थात लबाडी
त्यागून सत्याच्या पक्षाचा नसतो), ज्याला समजाविल्यावर देखील समज येत नाही अशा मनुष्यापासून दूर रहा.
11 नीट-व्यवस्थित-खात्रीने समजून ओळखून घे की असा मनुष्य वाकडा व्यवहार करणारा (सरळ नाहीये) आहे, तो
अपराधांमध्ये कायम आहे आणि म्हणून तो स्वतःच दोषी ठरला आहे.
12 ज्या वेळी मी अर्तमाला वा तुखिकाला तुझ्याकडे पाठवीन, त्या वेळी तू माझी भेट घेण्याचा हरेक प्रयत्न कर,
कारण हिवाळ्यात मी तेथेच राहण्याचा इरादा (निर्धार) केला आहे. 13 जेना वकील, व अपुल्लो यांना, त्यांच्या यात्रेसाठी
शक्य तितक्या घाईने रवाना कर, ते यासाठी की त्यांना कोणत्याच वस्तूची उणीव भासू नये. 14 आमच्या लोकांनीही
स्वतःस चांगल्या कार्यात गुंतवून ठेवणे शिकावे, गरजा भागविण्यासाठी, आवश्यकतांच्या पूर्तीसाठीच्या हेतूने त्यांनी
योग्य व न्याय्य अशा कार्यांत रमून राहण्याचे शिकावे, जेणेकरून त्यांचे जीवन व्यर्थ व फळहीन नसावे.
15 माझ्यासोबतच्या सर्वांकडून तुला आशीर्वाद मिळो, आणि जे आमच्यावर प्रेम करतात, त्यांना आशीर्वाद. आमेन-
होय, असेच होवो.